राज्यात विविध जिल्ह्यात माहे जून २०२६ ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत अतिवृष्टी व पूर परिस्थिती यामुळे शेतजमीनीच्या झालेल्या नुकसानाकरीता मदत देण्यासाठी निधी वितरीत करण्यास मंजुरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
मदत व पुनर्वसन विभाग
शासन निर्णय क्रमांक- सीएलएस २०२६/प्र.क्र. ३७५/मदत-१ (म-३)
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०२ नोव्हेंबर, २०२६

वाचा :-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.६७/म-११,दि.२४.०१.२०२३.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३,दि.२७.०३.२०२३
३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र. अआ/नैआ/महसूल/म.स./कावि/१२१/२०२६, दि. ०७.०८.२०२६
४) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र. अआ/नैआ/महसूल/म.स./कावि- /२०२६, दि. २५.०९.२०२६
५) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र. अआ/नैआ/महसूल/म.स./कावि- /२०२६, दि. २५.०९.२०२६
६) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र. मशा ७(५)/नै. आ. व्य./ गडचिरोली / जुलै - २६/शेतीपीक नुक/कावि-३६९/२०२६, दि. १६.०९.२०२६
७) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र. मशा ७(५)/नै. आ. व्य./ वर्धा / जुलै -२६/शेतीपीक नुक/कावि-३९०/२०२६, दि. २८.०९.२०२६
८) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र. मशा ७(५)/नै. आ. व्य./ चंद्रपूर / जुलै -२६/शेतीपीक नुक/कावि-३९१/२०२६, दि. २८.०९.२०२६
९) विभागीय आयुक्त, कोकण यांचे पत्र क्र. मशा/कार्या-६/नै. आ./माहे जुलै २०२६/ शेत जमीन नुक. / २०२६, दि. १५.०९.२०२६
१०) विभागीय आयुक्त, कोकण यांचे पत्र क्र. मशा/कार्या-६/नै. आ./माहे ऑगस्ट २०२६/ शेत जमीन नुक. / २०२६, दि. ०६.१०.२०२६
११) विभागीय आयुक्त, नाशिक यांचे पत्र क्र. मशा/टंचाई/ज-३/१२०२०/८०/२०२६ माहे जुलै व ऑगस्ट २०२६, दि. २९.०९.२०२६
१२) विभागीय आयुक्त, पुणे यांचे पत्र मह-३/ नैआ /कावि/ १९७/२०२६ , दि. ०७.०८.२०२६
१३) विभागीय आयुक्त, पुणे यांचे पत्र मह-३/ नैआ /कावि/ २१६/२०२६ , दि. ३१.०८.२०२६

<u>प्रस्तावना:</u>-

अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ या सारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास

पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे याकरिता शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान (Input subsidy) स्वरूपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विहित दराने मदत देण्यात येते. तसेच, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या इतर मान्य बाबींकरिता देखील विहित दराने मदत देण्यात येते. शासन निर्णय, दि.२७.०३.२०२३ अन्वये अतिवृष्टी व पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे राज्यात विविध जिल्ह्यात होणाऱ्या शेतजमीनीच्या नुकसानीकरिता बाधितांना मदत करण्याबाबत निकष निर्धारित केलेले आहेत. माहे माहे जून २०२६ **ते** ऑगस्ट २०२६ या कालावधीत अतिवृष्टी व पूर परिस्थिती यामुळे शेतजमीनीच्या झालेल्या नुकसानीसाठी विभागीय आयुक्त, अमरावती, नागपूर, कोकण, नाशिक व पुणे यांचेकडून संदर्भ क्र. ३ ते १३ येथील पत्रांन्वये निधी मागणीचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहेत.

शासन निर्णयः-

माहे माहे जून २०२६ **ते** ऑगस्ट २०२६ या कालावधीत राज्यात विविध जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व पूर परिस्थितीमुळे शेतजमीनीच्या नुकसानीसाठी बाधितांना मदत देण्याकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या दरानुसार एकूण रुपये २९,२१,०९,०००/- (रूपये एकोणतीस कोटी एकवीस लक्ष नऊ हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे उपलब्ध तरतुदीमधून अथवा आवश्यकतेनुसार पुर्नविनियोजनाव्दारे तरतुद उपलब्ध करुन घेऊन कार्यासन मदत-३ (म-११) यांनी हा निधी वितरित करावा.

अ) चालू हंगामामध्ये यापूर्वी सर्व विभागांना शेतीजमीनीच्या नुकसानीकरिता वितरीत करण्यात आलेल्या मदतीच्या निधीमध्ये या प्रस्तांवातर्गत मागणी करण्यात आलेल्या निधीचा समावेश नाही याची दक्षता घ्यावी. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विहित दराने मदत देण्यात येत असल्याची खात्री करावी.

ब) शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि.२७.०३.२०२३ नुसार, महसूल अभिलेख्यानुसार शेतजमीनीचे मालक असलेल्या फक्त अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना विहित दराने जास्तीत जास्त २ हेक्टरच्या मर्यादेत असल्याची खातरजमा करण्यात यावी.

३. वरील निधी खर्च करताना संदर्भाधीन सर्व शासन निर्णयातील सुचनांचे व निकषांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. ज्या प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी सदर निधी खर्च करण्यात यावा. ही मदत देताना केंद्र शासनाने चक्रीवादळ, पूर इत्यादी नैसर्गिक आपत्तीकरिता विहित केलेल्या अटी व शतींची पूर्तता होत असल्याची खात्री सर्व संबंधितांनी करावी.

४. लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्हयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा. या आदेशाव्दारे तसेच यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाव्दारे नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना दिलेला मदतीचा निधी बँकांनी कर्ज खात्यात अथवा अन्यथा वसुलीसाठी वळती करु नये याकरिता जिल्हाधिकारी यांनी सर्व बँकांना आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात. या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५. सदर निधीतून करण्यात येत असलेल्या खर्चाचे लेखे निधी आहरित करण्यात येणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात यावे व करण्यात आलेल्या खर्चाचा कोषागार कार्यालये व महालेखापाल कार्यालयाशी त्रैमासिक ताळमेळ घेण्यात यावा. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून तसेच राज्य शासनाच्या निधीमधून उपलब्ध करून दिलेला उपरोक्त निधी खर्ची पडल्यानंतर तातडीने निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधितांकडून प्राप्त करून घेवून एकत्रितरित्या शासनास सादर करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त यांची राहील.

६. वरील प्रयोजनासाठी होणारा खर्च मागणी क्र.सी-६, मुख्य लेखाशिर्ष २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय, ०२ पुर, चक्रीवादळे इत्यादी ११५, जमीनीतील वाळू/गाळ/क्षार काढून टाकण्यासाठी शेतकऱ्यांना सहाय्य (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१) (०१) जमीनीतील वाळू/ चिकणमाती व क्षार काढून टाकण्यासठी शेतकऱ्यांना सहाय्य, डोंगराळ शेतीवरील गाळ काढणे, मत्स्य क्षेत्रातील गाळ काढणे व ती पूर्ववत करून त्याची दुरूस्ती करणे, भूस्खलन, हिमस्खलन व नदीच्या रूपांतरामुळे झालेले नुकसान (अनिवार्य) , ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (२२४५ ०२९१) अंतर्गत उपलब्ध केलेल्या निधीमधून खर्च करण्यात यावा.

७. याबाबतची देयक अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांना सादर करण्याकरीता शासन निर्णय क्र. ओएफएम-१०/०७/प्र.क्र.२०२/ई, दिनांक १६.१०.२००७ अन्वये लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन

प्रभाग यांना आहरण व संवितरण अधिकारी आणि वित्तीय सल्लागार व सह सचिव यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६११०२१५४६१२६२४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून टाकण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by SUNIL SAHADEV SAMANT
Date: 2026.11.02 15:48:16 +05'30'

(सुनिल स. सामंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)) यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभाग) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा. मंत्री (मदत, पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (मदत, पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
९. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय,मुंबई,
११. अपर मुख्य सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई
१२. विभागीय आयुक्त, अमरावती / नागपूर / कोकण / नाशिक / पुणे
१३. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे
१४. सह सचिव (मदत), मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१६. संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
१७. सर्व संबंधित जिल्हाधिकारी
१८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१९. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
२०. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी,
२१. कार्यासन अधिकारी (म-११/म-३), मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
२२. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
२३. निवड नस्ती (कार्यासन/ मदत-१ (म-३)

मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय क्रमांक- सीएलएस २०२६/प्र.क्र. ३७५)/मदत-१ (म-३), दि. ०२ नोव्हेंबर, २०२६ सोबतचे विवरणपत्र							
अ.क्र.	**विभाग**	**जिल्हा**	**कालावधी**	**प्रस्तावाचा दिनांक**	**बाधित शेतकरी संख्या**	**बाधित क्षेत्र - हेक्टर**	**निधी (रू. लक्ष)**
१	**अमरावती**	यवतमाळ	जून-२०२६	०७.०८.२०२६	६४	२०.६०	३.७१
		बुलढाणा	जून-२०२६	०७.०८.२०२६	२८२	४८.६४	८.७६
		अमरावती	जून-२०२६	२५.०९.२०२६	३२	७.४५	३.५०
				एकूण	**३७८**	**७६.६९**	**१५.९७**
		अमरावती	जुलै-२०२६	२५.०९.२०२६	२५०६	७६१.२१	१४२.२०
		यवतमाळ	जुलै-२०२६	२५.०९.२०२६	४२६३	८४०.२७	१५२.९२
		बुलढाणा	जुलै-२०२६	२५.०९.२०२६	६४६५	२३८२.८७	१०७७.७०
				एकूण	**१३२३४**	**३९८४.३५**	**१३७२.८२**
				एकूण अमरावती विभाग	**१३६१२**	**४०६१.०४**	**१३८८.७९**
२	नागपूर	गडचिरोली	जुलै-२०२६	१६.०९.२०२६	२५	१८.८५	८.८६
		वर्धा	जुलै-२०२६	२८.०९.२०२६	३	०.३०	०.१४
		चंद्रपूर	जुलै-२०२६	२८.०९.२०२६	९२	३१.००	६.२६
				एकूण नागपूर विभाग	**१२०**	**५०.१५**	**१५.२६**
३	**कोकण**	पालघर	जुलै-२०२६	१५.०९.२०२६	६९०	१३३.९२	२८.५२
		रायगड	जुलै-२०२६	१५.०९.२०२६	६४३	१६४.२२	४३.१२
		रत्नागिरी	जुलै-२०२६	१५.०९.२०२६	१५०	५७.१४	२६
		सिंधुदुर्ग	जुलै-२०२६	१५.०९.२०२६	८	०.६३	०.१९

				एकूण	**१४९१**	**३५५.९१**	**९७.८३**
		रायगड	ऑगस्ट-२०२६	०६.१०.२०२६	३७	८.८	४.१६
		रत्नागिरी	ऑगस्ट-२०२६	०६.१०.२०२६	२२	२.५१	१.५४
				एकूण	**५९**	**११.३१**	**५.७०**
				एकूण कोकण विभाग	**१५५०**	**३६७.२२**	**१०३.५३**
४	नाशिक	जळगांव	जुलै-२०२६	२९.०९.२०२६	१६७	३४६.७८	१६१.७३
				एकूण नाशिक विभाग	**१६७**	**३४६.७८**	**१६१.७३**
५	**पुणे**	सातारा	जुलै-२०२६	०७.०८.२०२६	७३८	६१.७८	४५.५५
		पुणे	जुलै-२०२६	३१.०८.२०२६	१८७९७	२७८८.४३	१२०६.२३
				एकूण पुणे विभाग	**१९५३५**	**२८५०.२१**	**१२५१.७८**
				एकूण अमरावती+ नागपूर+ कोकण+ नाशीक + पुणे विभाग	**३४९८४**	**७६७५.४०**	**२९२१.०९**

रुपये २९,२१,०९,०००/- (अक्षरी रूपये एकोणतीस कोटी एकवीस लक्ष नऊ हजार फक्त)

Digitally signed by SUNIL SAHADEV SAMANT
Date: 2026.11.02 15:48:33 +05'30'

(सुनिल स. सामंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन